# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१/२६०५१११० ई-मेल आयडी :-sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/बाजार समिती/बाबनिहाय खर्च मर्यादा/निश्चिती करणे/ ९८५२ /सन २०२१ दिनांक : २३/६/२०२१

वाचाले :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (पाच).

३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२०.

४. या प्राधिकरणाकडील पत्र जा.क्र. ८५५०/सन २०१९, दिनांक ०७.१२.२०१९.

५. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. १४५३/सन २०२१, दिनांक २९.४.२०२१.

६. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. जा.क्र. १४९९/सन २०२१, दिनांक ०५.०५.२०२१.

<u>प्रस्तावना</u> :-

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) (१) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (ब) मधील तरतुदीनुसार मतदारांची यादी तयार करण्याच्या आणि निवडणूकांचे कामकाज चालविण्याच्या प्रयोजनासाठी, कोणत्याही वर्षात फीच्या रुपाने मिळालेल्या सर्व रक्कमांच्या दहा टक्के किंवा एक लाख रुपये यांपैकी जी कमी असेल त्या रक्कमेचा मिळून होईल असा निवडणूक निधी स्थापन करणे प्रत्येक कृषि उत्पन्न बाजार समितीस बंधनकारक आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (पाच) मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी निवडणूक निधीत आगाऊ जमा करावयाची आवश्यक असलेली निवडणूक खर्चाची रक्कम कलम १४ च्या पोट कलम (१) अन्वये जमा करण्याबाबत आदेश देण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये दिनांक १७.१.२०१८ रोजी सुधारणा होऊन बाजार समित्यांच्या निवडणूकीत बाजार क्षेत्रातील पात्र शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देण्यात आलेला असल्यामुळे प्राधिकरणाने वाचावे क्र. ४ च्या पत्रानुसार निवडणूकीकरीता आवश्यक असणारा निवडणूक निधी प्रती मतदार रु. ५०/- प्रमाणे निवडणूक निधी जमा करणे संदर्भात बाजार समित्यांना आदेशीत केलेले आहे. मात्र महाराष्ट्र कृषि उत्पन्ना पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२० नुसार बाजार समित्यांच्या निवडणूकीत शेतकरी यांच्या ऐवजी बाजार क्षेत्रातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था सदस्य व ग्रामपंचायत सदस्य यांना मतदानाचा अधिकार प्राप्त झालेला आहे. परिणामी निवडणूकीकरीता लागणाऱ्या निधीच्या आवश्यकतेत बदल करणे आवश्यक झाले आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ६७ (३) मधील तरतुदीनुसार जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा यथास्थिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूकीकरीता प्राप्त झालेला निवडणूक निधीचे विवरण व निवडणूकीकरीता झालेला खर्च व त्याची देयके

बाजार समितीची निवडणूक झाल्यापासून तीन महिन्याच्या आत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे पाठवणे बंधनकारक आहे.

ज्या अर्थी प्राधिकरणाने वाचले क्रमांक ५ च्या आदेशानुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेण्याकरीता संबंधीत जिल्हयातील जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) म्हणून घोषित केलेले आहे.

ज्या अर्थी प्राधिकरणाने वाचले क्रमांक ६ च्या आदेशानुसार जिल्हा निवडणूक अधिकारी यांना जिल्हा निवडणूक अधिकारी (ए.पी.एम.सी.) या नावाने भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेत स्वतंत्र निवडणूक निधी खाते उघडण्यास परवानगी दिलेली आहे.

त्याअर्थी, प्राधिकरण कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा निवडणूक खर्च नियंत्रीत व मर्यादीत ठेवणे संदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

-: आदेश :-

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) व महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (पाच) अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीकरीता लागणाऱ्या सर्व प्रकारच्या निवडणूक खर्चात सुसुंत्रता आणणे, अनावश्यक खर्च टाळणे, निवडणूक खर्च नियंत्रीत व मर्यादीत ठेवण्यासाठी निवडणूकीतील बाबनिहाय खर्चाबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

अ. <u>जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी करावयाची कार्यवाही :-</u>

१. अंदाजित निवडणूक निधी मर्यादा ठरविण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक मतदार यादीतील एकूण मतदारांची संख्या व खाली नमूद केलेल्या विवरण पत्रातील बाबनिहाय मर्यादा विचारात घेऊन अंदाजित निवडणूक निधी ठरवावा. त्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी खालील विवरण पत्राप्रमाणे, बाजार समितीच्या मतदार यादींतील मतदार संख्येनुसार निवडणूकीसाठी आवश्यक असणारी मतदान केंद्र संख्या निश्चित करुन, खालील विवरणपत्रातील निवडणूकीकरीता निर्धारीत केलेल्या बाबनिहाय होणाऱ्या खर्चाची गणना करावी. त्यानुसार कृषि उत्पन्न बाजार समितीकडून निधी भरुन घेण्यासाठी खालील विवरण पत्रानुसार अंदाजपत्रक तयार करुन, कृषि उत्पन्न बाजार समितीकडून निवडणूकीकरीता अंदाजित निवडणूक निधी रक्कमेची मागणी करावी. प्रती मतदान केंद्र मतदार संख्या किमान ४०० राहील याची दक्षता घ्यावी.

२. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी कृषि उत्पन्न बाजार समितीकडून मागणी केलेली अंदाजित निवडणूक निधीची रक्कम आपल्या बँक खात्यात A/c Payee रेखांकित धनादेश / डिमांड ड्राफ्ट / NEFT / RTGS व्दारे भरणा करुन घ्यावी. प्राधिकरणाने वेळोवेळी निवडणूकीसाठी लागणारा खर्च किमान ठेवण्याच्या दृष्टिने सूचना दिलेल्या आहेत. त्याचे अनुपालन करुन अकारण बाजार समित्यांकडून जादा निवडणूक निधीची मागणी करु नये.

३. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांना रक्कम वितरीत करताना संबंधीत कृषि उत्पन्न बाजार समितीच्या नावासह निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नावाने रेखांकित धनादेशाने दयावी किंवा NEFT / RTGS द्वारे द्यावी.

४. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी कृषि उत्पन्न बाजार समितीकडून बँक खात्यात जमा झालेल्या तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांना वितरीत केलेल्या रक्कमांचे जमाखर्च तात्काळ या आदेशासोबत जोडलेल्या नोंदवहीत नोंदवावेत.

५. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर १५ दिवसात निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडुन प्रपत्र १ ते २८ मधील माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या देयकांसह प्राप्त करुन घ्यावी. प्राप्त माहितीनुसार निवडणूकीकरीता प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्धारीत केलेल्या खर्चापेक्षा जास्तीचा खर्च झालेला असल्यास सदरचा प्रस्ताव आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह प्राधिकरणास निवडणूक निकालाच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत मान्यतेस्तव सादर करावा. तसेच मर्यादेच्या आतील खर्चास जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) स्तरावर मान्यता देऊन हिशोब अंतीम करावा.

६. निवडणूकीकरीता झालेला निवडणूक खर्च वगळता उर्वरीत अखर्चीत निवडणूक निधी संबंधीत बाजार समितीस रेखांकित A/c Payee धनादेश, NEFT/RTGS व्दारे निवडणूक निकालाचे दिनांकापासून एक महिन्याचे आत परत करावा.

७. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी कॅलेंडर वर्षात होणा-या निवडणूकांचा अंदाज घेऊन वर्षभरासाठी जिल्हयात होणा-या बाजार समित्यांच्या निवडणूक प्रित्यर्थ खरेदी करणे आवश्यक असणा-या साहित्यासाठी जाहिर निविदा प्रक्रिया राबवून पुरवठादार निश्चित करावेत जेणेकरुन साहित्याचे दर अवास्तव राहणार नाहीत. सदर पुरवठादारांकडे TAN व VAT (GST) नंबर असावा.

८. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी अंदाजित निवडणूक खर्च व अंतिम निवडणूक खर्चाचे तपशील प्रपत्र १ ते २८ नुसार तपशिलवार देयकांचे प्रतीसह अभिलेखात जतन करुन ठेवावे. प्रत्येक बाजार समितीच्या निवडणूकीत केलेल्या खर्चाची माहिती १ ते २१, १ ते २८ आणि १ ते ३१ विवरणपत्रात प्राधिकरणांस सादर करणे बंधनकारक राहिल.

९. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी निवडणूक खर्चाबाबत काटकसरीचे धोरणांची अंमलबजावणी करावी. अनावश्यक खर्च टाळावेत.

ब. <u>निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही :-</u>

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यानंतर निवडणूक निधी खर्चाबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांच्याकडून रेखांकित धनादेशाद्वारे प्राप्त रक्कम निवडणूक निर्णय अधिकारी यांनी <u>संबंधीत कृषि उत्पन्न बाजार समितीच्या नावासह निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नावाने बँक चालू खाते उघडून त्यामध्ये रक्कम भरणा करावी.</u> प्राप्त निवडणूक निधीचा तपशील व त्याचा हिशोब निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेनंतर १५ दिवसात संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांच्याकडे सादर करावा व एक प्रत थेट प्राधिकरणास सादर करावी. रु.२०,०००/- च्या आतील बाबनिहाय प्रदानाच्या रक्कमा धनादेशाने / रोखीद्वारे व रु. २०,०००/- वरील रक्कमांचा खर्च रेखांकित धनादेशाद्वारे / NEFT / RTGS द्वारे करावा.

२. ज्या बाबींची खरेदी करावयाची आहे त्याबाबींची जाहिर निविदा / कोटेशन मागवून व तुलनात्मक तक्ता करुन कमी दराच्या निविदा / कोटेशन अंतिम कराव्यात. <u>रु.५०,०००/- पेक्षा जास्त खरेदीसाठी कोटेशन मागवावे त्यापेक्षा कमी रक्कमेस कोटेशन मागविणेची आवश्यकता नाही.</u> सदर खरेदी जिल्हाधिकारी यांच्या मंजूर दरसूचीनुसार खरेदी करण्यात यावी किंवा यासाठी जिल्हा

निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी विहीत जाहिर निविदा प्रक्रिया राबवून निश्चित केलेल्या पुरवठादार (शक्यतो TAN व VAT (GST) नंबर असलेल्या) यांचेकडुन खरेदी करावेत. वस्तुची खरेदी करताना वस्तुंचा दराबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडील दरसुचीतील दर हे आधारभूत मानावे त्यापेक्षा जास्त दर दिला जावू नये.

३. अपवादात्मक परिस्थितीत उपरोक्त निर्धारीत व अंदाजित निवडणूक निधीपेक्षा जास्त निवडणूक निधी लागणार असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्याबाबतच्या खर्चाचे समर्थनीय कारणासह तपशिलवार प्रस्ताव जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांचेकडे सादर करावा व त्यांचेकडून मंजूर करुन घ्यावा. त्यांचे मंजूरीनंतरच जादा निवडणूक निधी जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांचेमार्फत दिला जाईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत मंजूर केलेली अथवा न केलेली रक्कम कृषि उत्पन्न बाजार समितीकडून परस्पर उचल करु नये. सदर कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत निवडणूकीतील मतदानाच्या नियत दिंनाकापूर्वी जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी पुर्ण करावी.

४. प्रत्येक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीत केलेल्या खर्चाची माहिती १ ते २१, १ ते २८ आणि १ ते ३१ विवरणपत्रात जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) व प्राधिकरणास सादर करणे बंधनकारक राहिल.

५. निवडणूकीचा खर्च मर्यादेत झाल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून १५ दिवसात निवडणूक खर्चाचा हिशोब पुर्ण करुन त्यांच्याकडील शिल्लक अखिर्चित रक्कमा जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांच्याकडे निवडणूक अहवालासह परत कराव्यात. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी निवडणूक निकालाचे दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्यांच्याकडील शिल्लक रक्कमा असल्यास सदरच्या रक्कमा संबंधीत कृषि उत्पन्न परत करावी. व झालेल्या जमा खर्चाची माहिती / तपशिल कृषि उत्पन्न बाजार समितीस देणे बंधनकारक राहिल.

६. निवडणूकीचा खर्च मर्यादेपेक्षा जादा झाल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक निकाल जाहिर केल्यानंतर १५ दिवसात अंदाजित निवडणूक निधी मर्यादेपेक्षा ज्यादा झालेल्या खर्चाचे प्रस्ताव जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांच्याकडे सादर करावेत. प्रस्ताव सादर करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक खर्चाच्या पावत्या स्वत:च्या सही शिक्यानिशी (Self Attested) प्रमाणित करुन प्रपत्र १ ते २८ नुसार क्रमाने लावून प्रस्तावासोबत जोडाव्यात. तसेच प्रस्तावासोबत प्रपत्र १ ते २१, १ ते २८ व १ ते ३१ मधील संपूर्ण माहिती सादर करावी.

७. निवडणूक निधीमधूनच सर्व मानधन व भत्ते, पदाधिकारी निवडणूकीचा परिश्रामिक खर्च करावयाचा आहे. त्यासाठी निवडणूक निर्णय अधिका-यांने परस्पर कृषि उत्पन्न बाजार समितीकडून स्वंतत्र निवडणूक निधीची मागणी करु नये. तसेच कृषि उत्पन्न बाजार समितीस निवडणूक प्रित्यर्थ कोणताही खर्च परस्पर करणेस सांगू नये.

८. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी शिल्लक अखर्चित निवडणूक निधी निवडणूक निकाल घोषित झालेपासुन ७ दिवसांचे आत जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांना परत करुन त्याची पोहच दप्तरी ठेवावी. उमेदवार अनामत ठेव रक्कमेचे प्रदानासाठी निवडणूक निकाल घोषित झालेचे दिनांकापासून ७ दिवसाचे आत उमेदवारांचे नावाने रेखांकित धनादेश संस्थेस सुपूर्त करावेत. आणि

त्याची पोहोच / पावती घ्यावी. तसेच संस्थेने सदर धनादेश संबंधिताचे खात्यात जमा करावेत किंवा संबंधितास देण्यात यावेत आणि पोहोच दप्तरी ठेवावी.

९. निवडणूक नियम ६९ (४) नुसार जप्त केलेली उमेदवार ठेव अनामत रक्कम प्राधिकरणाचे पुणे येथील खात्यावर निवडणूक निकालाचे दिनांकापासून ७ दिवसाचे आत वर्ग करावी व त्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा. सदर जप्त रक्कम **राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, निवडणूक निधी (बँकेचे नाव - स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा - पुणे मुख्य, खाते क्र. ३४९४४७०३३३८)** या नावाने धनाकर्षाव्दारे (DD) / बँकर्स चेकव्दारे प्राधिकरणास समक्ष सादर करावी.

१०. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रीया राबविताना प्राधिकरणाच्या निवडणूक खर्च काटकसरीच्या धोरणांची काटेकोरपणे अमंलबजावणी होईल यांची दक्षता घ्यावी. निवडणूक खर्च करतांना बचतीचे धोरण ठेवावे. अनावश्यक व दुबार खर्च करण्यात येऊ नये.

क. **<u>विवरणपत्रातील २८ बाबींबाबत मार्गदर्शक सूचना :-</u>**

| अ.क्र. | बाब | तपशील व अनुज्ञेय दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मतपत्रिका छपाई<br>१. सहकारी संस्था मतदारसंघ<br>I. सर्वसाधारण<br>ii. महिला<br>iii. इमाव<br>iv.वि.जा./भ.ज./ वि.मा.प्र.<br>२. ग्रामपंचायत मतदार संघ<br>i. सर्वसाधारण<br>ii. अ.जा./अ.ज.<br>iii. आर्थिक दृष्टया दुर्बल घटक.<br>३. व्यापारी मतदासंघ<br>४. हमाल व तोलारी मतदारसंघ | ➢ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने मतपत्रिका छपाई करताना ती प्राधान्याने शासकीय मुद्रणालयाकडून छपाई करुन घ्यावी. तसे शक्य होत नसल्यास समर्थनीय कारणे नमूद करुन सहकारी अथवा खाजगी मुद्रणालयांकडून छपाई करुन घ्यावी.<br>➢ त्याबाबत किमान ३ दरपत्रके/जाहिर निविदा (मतपत्रिका छपाईसाठी होणारा खर्च शासनाने विनानिविदा खरेदीकरीता निर्धारीत केलेल्या मर्यापेक्षा जास्त होत असल्यास स्थानिक जास्त खपाच्या वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिध्द करावी) मागवून घेण्यात याव्यात व दर ठरविताना खालील प्रमाणे किमान व कमाल मर्यादा निर्धारीत करण्यात येत आहे. त्यापेक्षा जादा खर्च अनुज्ञेय नाही.<br>i. **सर्वसाधारण** रु. ४/- ते रु. ६/-<br>ii. **महिला** रु. ३/- ते रु. ४/-<br>iii. **अजा / अज** रु. ३/-<br>iv. **इमाव** रु. ३/-<br>v. **विजा / भज / वि.मा.प्र** रु. ३/-<br>vi. **आर्थिक दृष्टया दुर्बल घटक** रु. ३/-<br>vii. **व्यापारी** रु. ३/- ते रु. ४/-<br>viii. **हमाल व तोलारी** रु. ३/- ते रु. ४/-<br>➢ उपरोक्त प्रमाणे दरामध्ये अपवाद्वात्मक परिस्थितीत छपाई शक्य नसल्यास जिल्हा निवडणूक अधिका-याची पूर्व परवानगी घेऊन मतपत्रिकांची छपाई करण्यात यावी. तसेच मतदानासाठी मतपत्रिका छपाई करताना एकुण मतपत्रिकेच्या १०% जादा मतपत्रिका छपाई करुन घेण्यास मुभा असेल, मात्र त्यापेक्षा जादा मतपत्रिका छपाई करणे अनुज्ञेय नाही.<br>➢ निविदेद्वारे निश्चित होणारे दर वर दिलेल्या दरांपेक्षाही किंवा शासकीय मुद्रणालयाच्या दरापेक्षाही कमी येण्याची संभावणा असेल. तथापि अंतिम दर निश्चित करतांना शासकीय मुद्रणालयाच्या दरांपेक्षा प्रस्तावित दर जास्त नसतील हयाची खबरदारी घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| २. | मतपेटी खरेदी / भाडयाने घेणे (संख्या) | मतपेटी खरेदी करताना खरेदीची किंमत रु.५००/- ते रु.८००/- प्रती पेटी निर्धारित करण्यात येत आहे. तसेच मतपेटी भाडे तत्वावर घेताना प्रती मतपेटी भाडे <u>*जास्तीत जास्त रु. १५०/-*</u> इतके अनुज्ञेय असेल. वरील मर्यादेपेक्षा जादा दराची मतपेटीकरीता खर्च केल्यास वाढीव खर्च अनुज्ञेय राहणार नाही. |
| ३ | प्रत्यक्ष मतदान केंद्रांवर लागणारी स्टेशनरी (उदा. बाणफुलीचे शिक्के, कुलुप, लाख, लिफाफे, इंकपॅड, शाई, मतदान कक्ष साहित्य, इ.) | ➢ यामध्ये मतदान व मतमोजणीसाठी लागणारे सर्व साहित्याचा समावेश होईल.<br>➢ सर्वसाधारणपणे प्रत्येक केंद्रात १ याप्रमाणे प्रत्येक वस्तुचे नग खरेदी करावे.<br>➢ काही साहित्य राखीव (१०%) स्वरूपात निवडणूक निर्णय अधिकारी यांचे स्तरावर ठेवावे.<br>➢ साधारणत: पहिल्या दोन केंद्रासाठी प्रत्येकी रु. १,५००/- व नंतर प्रति केंद्र रु. १,०००/- च्या आत खर्च अनुज्ञेय राहिल. (मतपेटी खर्च वगळून) |
| ४. | बुथ संख्या वाहन संख्या व वाहन खर्च | ➢ प्रत्येक स्वतंत्र स्थळी असलेल्या मतदान केंद्रास स्वतंत्र वाहन पुरविणे आवश्यक असल्यास ते देण्यात यावे.<br>➢ जिल्हा प्रादेशीक परिवहन अधिकारी यांनी निर्धारीत केलेल्या प्रचलीत दरास अधीन राहुन वाहनांसाठी आवश्यकतेप्रमाणे खर्च करण्यात यावा.<br>➢ वाहन भाडे ३०० कि.मी. पर्यंत रु. २,५००/- ते रु. ३,५००/- इतके भाडे डिझेल, वाहन चालकाचे वेतन व पथकर इ. खर्चासहित प्रती दिन प्रती बुथ अनुज्ञेय राहील.<br>➢ निवडणूकीच्या कामकाजाकरीता वाहन वापर करतांना वाहनाचा वापर हा मतदान व मतमोजणी या दिवसांकरीताच करावा. |
| ५ | मतदान केंद्र भाडे | ➢ मतदान केंद्र भाडयाने घेताना संबंधीत बाजार समितीच्या जागांचा वापर प्राधान्याने करावा. अशा जागा नसल्यास इतर सहकारी संस्था, जिल्हा परिषदेच्या शाळांचा व स्थानिक स्वराज्य संस्थांचा वापर करावा.<br>➢ मतदान केंद्राकरीता होणारा खर्च नियंत्रणात ठेवावा. तसेच मंगल कार्यालयाची / खाजगी जागा शक्यतो घेवू नये.<br>➢ शासकीय/निमशासकीय/ सहकारी संस्था यांची जागा उपलब्ध नसल्यास सदरचा खर्च करावा. |
| ६. | मतमोजणी केंद्र वीज / जनरेटर / बल्ब इ. <u>*(जनरेटर चा वाहतूक खर्चासह)*</u> | ➢ मतमोजणीसाठी जनरेटरची आवश्यकता असू शकते. फक्त मतमोजणीच्या ठिकाणी आवश्यकता असल्यास जनरेटर व्यवस्था करण्यात यावी.<br>➢ सदर खर्चाची बीले सादर करतांना अन्य बाबींवरील खर्चांचा त्यात समावेश करु नये. मतमोजणी केंद्रासाठी वीज, बल्ब व जनरेटर यावरील केलेलाच खर्च बाबनिहाय नमूद करण्यात यावा.<br>➢ वीज पुरवठा खंडीत होत असल्यासच सदरचा खर्च करावा. |
| ७. | मतदान केंद्र कर्मचारी जेवण, चहा, नाष्टा, | ➢ निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान प्रतिनिधी व मतदान केंद्रावर निर्धारीत केलेल्या कर्मचाऱ्यांना प्रत्येकी चहा, नाष्टा, व जेवणासाठी रु. २००/- इतका दैनिक खर्च अनुज्ञेय असेल.<br>➢ जेवणाचा पुरवठा प्रत्यक्ष केला नसल्यासच रु. २००/- इतकी रक्कम रोख स्वरुपातमध्ये भत्ता म्हणून अदा करणे अनुज्ञेय राहील.<br>➢ सदर भत्ता मतदान पुर्व दिवस (मुक्कामी जावे लागल्यास) प्रत्यक्ष मतदान दिनांक व मतमोजणी दिनांक या दिवसांकरीताच अदा करणे अनुज्ञेय असेल.<br>➢ निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सदर मर्यादेत दैनिक चहा, जेवण व नाष्टा उपलब्ध करुन दयावयाचा आहे. |